# पहा नियम ६ (१)
# महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. ९४ दि. 02/03/2023
2022-23
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

प्रति,
शासकीय माहिती अधिकारी,
उद्यान विभाग,
मीरा भाईंदर महानगरपालिका

**अर्जदाराचे नाव** : श्री. जय श्रृंगारपुरे

पत्ता : १, रिझवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे,
गोपी टँक मार्ग, माहीम, मुंबई - ४०००१६.

**मोबाईल नंबर** : ९८२० २२ १७८३

आवश्यक **असलेल्या माहितीचा** तपशील : गाव देवी मंदिर मार्ग, जरीमरी तलाव समोर, काशी गाव येथील, **श्री ओसवाल ग्रुप** मार्फत बांधण्यात येत असलेल्या **ओसवाल इमराल्ड** या प्रकल्पा संदर्भात माहिती मिळणे बाबत..

१. सदर जागेवर किती वृक्ष होते आणि त्यात किती वक्षांना कापण्याची, तसेच किती वृक्षांना स्थलांतरण (ट्रान्सप्लांट) करण्याचे आदेश / परवानगी मिळाली होती त्याची माहिती सत्यप्रति करून मिळावी.

२. त्यांनी कापण्यात आलेल्या वृक्षांपैकी / ऐवजी दुसऱ्या ठिकाणी किती वृक्ष लावण्याचे आदेश दिला आहे. तसेच नियमा प्रमाणे सहा-सहा महिन्याच्या अंतरावर तीन वर्षे केलेल्या प्लांटेशनचे छायाचित्रे महानगरपालिकेला सादर केलेल्या फोटोची प्रत मिळावी

३. वृक्षे कुठे स्थलांतरीत (ट्रान्सप्लांट) केलेली आहेत त्या जागेच्या फोटो ची प्रत मिळावी.

४. विकासकाद्वारे जी वृक्ष कापली गेली आहेत त्या ऐवजी शासन नियमाप्रमाणे त्यांनी दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आलेल्या नवीन वृक्षांचे फोटोस व जागेची माहिती मिळावी.
**विशेषः वरील सर्व पुरावे / माहीती सत्यप्रती करून मिळावे.**

माहिती संबंधित कालावधी — **संबंधित कालावधी**

माहिती टपालाद्वारे की व्यक्तिशः आवश्यक आहे — **व्यक्तिशः**

ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन — **स्वतःच्या माहितीकरिता**

ठिकाण: **मुंबई**
दिनांक: **२७ फेब्रुवारी २०२३**




(जय श्रृंगारपुरे)
अर्जदार

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ ७१ /२०२३-२४** **दिनांक : १९ /०४/२०२३**

**प्रति,**
**श्री.जय श्रुंगारपुरे**
**१ रिझवी निकेतन,**
**सिटी लाईट सिनेमा मागे,**
**गोपी टॅक माहिम मुंबई -४०००१६**

माहितीचा अधिकार

**विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये गाव देवी मंदिर मार्ग, जरीमरी तलाव समोर काशिगाव येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पा संदर्भात माहिती मिळणे बाबत.**
**संदर्भ :- आपला दि. ०२/०३/२०२३ रोजीचा अर्ज.**

केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मिरारोड (पु) गाव देवी मंदिर मार्ग, जरीमरी तलाव समोर काशिगाव येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड प्रकल्प संदर्भात सविस्तर माहिती मिळणेबाबत संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार या विभागात असलेले अभिलेख तपासले असता खालील प्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विषय | उत्तर |
|---|---|---|
| १ | सदर जागेत किती वृक्ष आहे.<br>वृक्षांना कापण्याची,तसेच किती वृक्षांना स्थंलातरण करण्याचे आदेश/ परवानगी मिळाली होती. | गाव देवी मंदिर मार्ग, जरीमरी तलाव समोर काशिगाव येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पाकरिता झाडे कापण्यासाठी व स्थलांतरीत करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही |
| २ | वृक्ष कापण्यात आलेल्या वृक्षांपैकी/ दुसऱ्या ठिकाणी किती वृक्ष लावण्याचे आदेश दिलेला आहे.<br>तसेच नियमाप्रमाणे सहा –सहा महिन्याच्या अंतरावर तीन वर्षे केलेल्या प्लांटेशनचे छायाचित्रे महानगरपालिकेला सादर केलेल्या फोटोची प्रत मिळावी | अनुक्रमांक- १ प्रमाणे |
| ३ | वृक्ष कुठे स्थलांतरीत केलेली आहे. त्या जागेच्या फोटो ची प्रत मिळावी | अनुक्रमांक- १ प्रमाणे |
| ४ | विकासद्वारे जी वृक्ष कापली गेली आहेत त्या ऐवजी शासन नियमाप्रमाणे त्यांनी दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आलेल्या नविन वृक्षांचे फोटोस व जागेची माहिती मिळावी. | अनुक्रमांक- १ प्रमाणे |

(नागेश विरकर)
**जन माहिती अधिकारी तथा**
**उप.मुख्य उद्यान अधिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

उद्यान विभाग

**पहा नियम ६ (१)**
**महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५**

प्रति,
शासकीय माहिती अधिकारी,
उद्यान विभाग,
मीरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नाव | : | श्री. जय शृंगारपुरे |
| पत्ता | : | १, रिझवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे, गोपी टँक मार्ग, माहीम, मुंबई - ४०००१६. |
| मोबाईल नंबर | : | ९८२० २२ १७८३ |
| आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील | : | गाव देवी मंदिर मार्ग, जरीमरी तलाव समोर, काशी गाव येथील, **श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड** या प्रकल्पा संदर्भात माहिती मिळणे बाबत.. |

१. सदर जागेवर किती वृक्ष होते आणि त्यात किती वक्षांना कापण्याची, तसेच किती वृक्षांना स्थलांतरण (ट्रान्सप्लांट) करण्याचे आदेश / परवानगी मिळाली होती त्याची माहिती सत्यप्रति करून मिळावी.

२. त्यांनी कापण्यात आलेल्या वृक्षांपैकी / ऐवजी दुसऱ्या ठिकाणी किती वृक्ष लावण्याचे आदेश दिला आहे. तसेच नियमा प्रमाणे सहा-सहा महिन्याच्या अंतरावर तीन वर्षे केलेल्या प्लांटेशनचे छायाचित्रे महानगरपालिकेला सादर केलेल्या फोटोची प्रत मिळावी

३. वृक्षे कुठे स्थलांतरीत (ट्रान्सप्लांट) केलेली आहेत त्या जागेच्या फोटो ची प्रत मिळावी.

४. विकासकाद्वारे जी वृक्ष कापली गेली आहेत त्या ऐवजी शासन नियमाप्रमाणे त्यांनी दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आलेल्या नवीन वृक्षांचे फोटोस व जागेची माहिती मिळावी.
**विशेष: वरील सर्व पुरावे / माहीती सत्यप्रती करून मिळावे.**

| | |
|---|---|
| माहिती संबंधित कालावधी | **संबंधित कालावधी** |
| माहिती टपालाद्वारे की व्यक्तिशः आवश्यक आहे | **व्यक्तिशः** |
| ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | **स्वतःच्या माहितीकरिता** |

पोच
०२/०३/२०२३
लिपीक
उद्यान व वृक्ष प्राधिकरण वि
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

ठिकाण: **मुंबई**
दिनांक: **२७ फेब्रुवारी २०२३**




Jay
(जय शृंगारपुरे)
अर्जदार

माहितीचा
अधिकार

जा.क्र.मिभामनपा/उपआ./26/२०२३
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१,
दुरध्वनी क्र.२८१९२८२८,
दिनांक:१० / ५ /२०२३

सुनावणी दिनांक:-१७ / ०५ /२०२३
वेळ :-१२ वाजता

प्रति,
श्री. जय श्रृंगारपुरे,
१.रिजची निकेतन, सीटीलाईट सिनेमा मागे,
गोपी टँक रोड, माहिम, मुंबई – ४०० ०१६

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल प्रथम अपिल
संदर्भ :- आपला दि. ०९/०५/२०२३ रोजीचा अपील अर्ज.
(या कार्यालयाकडे प्राप्त दि. ०९/०५/२०२३)

उपरोक्त संदर्भिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये दाखल केलेला दि.०९/०५/२०२३ रोजीचा अपिल अर्ज दि.०९/०५/२०२३ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर संदर्भाधिन प्रथम अपिलाची सुनावणी, खाली दिलेल्या नमुद दिवशी/वेळी आयोजित करण्यात आलेली असुन सुनावणीस आपण उपस्थित रहावे.

सुनावणीचा दिनांक व वेळ :- दि.१७/५ /२०२३ रोजी १२.०० वाजता.
ठिकाण :- प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचे दालन,
तिसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे ४०११०१.

(कल्पिता पिंपळे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, प्रभाग समिती क्र.४,५,६
मिरा भाईंदर महानगरपालिका, यांना सुनावणीचे दिवशी आवश्यक त्या
कागदपत्रांसह उपस्थित राहणेकामी
(सोबत:- श्री. जय श्रृंगारपुरे यांच्या संदर्भिय अर्जाची छायांकित प्रत)

अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/२६/२०२३-२४
दि.०२/०६/२०२३.

माहितीचा अधिकार

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री. जय श्रृंगारपुरे, ................अपिलार्थी
१, रिजवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे,
गोपी टँक रोड, माहिम मुंबई – ४०० ०१६

श्री.नागेश विरकर ................प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य उदयान अधिक्षक,
उदयान विभाग.

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. ४६ दि. २४/०६/२०२३
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

**प्रस्तावना :-**

श्री. जय श्रृंगारपुरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग यांचेकडे गावदेवी मंदिर मार्ग, जरीमरी तलावा समोर, काशी गाव येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पा संदर्भात दि.२७/०२/२०२३ रोजी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज सादर करून माहिती मागितली होती.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता मागितलेली माहिती न देता अर्धवट माहिती देवून दिशाभूल करण्याचे प्रयत्न करणे व जाणुनबुजून माहिती लपविली असल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०९/०५/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी उपस्थित असून जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-**

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता मागितलेली माहिती न देता अर्धवट माहिती देवून दिशाभूल करण्याचे प्रयत्न केला असून जाणुनबुजून माहिती लपविली असल्याने अपिल केले आहे.

जनमाहिती अधिकारी, तथा उपमुख्य उदयान अधीक्षक यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवा

मुद्दा क्र.१ विषयी उपलब्ध असलेली माहिती जा.क्र.मनपा/ उदयान/ मिरारोड/ मा.अ/ ०
२४ दि.१९/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

-: **विवेचन** :-

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकुन घेतले असता असे निदर्शनास येते की, श्री ओसवाल बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पाकरीता झाडे कापण्यासाठी व करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. तथापि गावदेवी मंदिर, जरीमरी तलाव समोर, येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या प्रकल्पाच्या जागेवर किती वृक्ष आहेत उपलब्ध असल्यास त्याबाबत माहिती अपिलार्थी यांना देणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

1) सदर अपिल मान्य करण्यात येत आहे.
2) श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पाच्या जागेवर आहे याबाबतीत माहिती उपलब्ध असल्यास जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसात विनामूल्य उपलब्ध करून दयावी.
3) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(कल्पिता पिंपळे)
प्रथम अपिलीय अधिकारी त
उपायुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालि

प्रति :-
1) श्री. जय श्रृंगारपुरे,
१, रिजवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे,
गोपी टँक रोड, माहिम मुंबई – ४०० ०१६
2) उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग, प्रभाग समिती क्र.४,५,६
3) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान) यांचे कार्यालय.

**जनमाहिती अधिकारी, तथा उपमुख्य उदयान अधीक्षक यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद**:-

मुद्दा क्र.१ विषयी उपलब्ध असलेली माहिती जा.क्र.मनपा/ उदयान/ मिरारोड/ मा.अ/ ०१/ २०२३-२४ दि.१९/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

**-: विवेचन :-**

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकुन घेतले असता असे निदर्शनास येते की, श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पाकरीता झाडे कापण्यासाठी व स्थलांतरीत करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. तथापि गावदेवी मंदिर, जरीमरी तलाव समोर, काशिगाव येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या प्रकल्पाच्या जागेवर किती वृक्ष आहेत ही माहिती उपलब्ध असल्यास त्याबाबत माहिती अपिलार्थी यांना देणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

1) सदर अपिल मान्य करण्यात येत आहे.
2) श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पाच्या जागेवर किती वृक्ष आहे याबाबतीत माहिती उपलब्ध असल्यास जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करून दयावी.
3) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(कल्पिता पिंपळे)
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (उदयान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति** :-

1) श्री. जय श्रृंगारपुरे,
१, रिजवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे,
गोपी टँक रोड, माहिम मुंबई – ४०० ०१६
2) उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग, प्रभाग समिती क्र.४,५,६
3) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान) यांचे कार्यालय.

अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/२६/२०२३-२४
दि०२/०६/२०२३.

माहितीचा अधिकार

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर मा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री. जय श्रृंगारपुरे, ……………..अपिलार्थी
१, रिजवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे,
गोपी टँक रोड, माहिम मुंबई – ४०० ०१६

श्री.नागेश विरकर ……………..प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य उदयान अधिक्षक,
उदयान विभाग.

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिति क्र. ४, ५ व ६
आवक क्र. ७५ दि. ९२/०६/२०२३
२०२३-२४
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

**प्रस्तावना** :-

श्री. जय श्रृंगारपुरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिका उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग यांचेकडे गावदेवी मंदिर मार्ग, जरीमरी तलावा समोर, गाव येथील श्री ओसवाल ग्रुप मार्फत बांधण्यात येत असलेल्या ओसवाल इमराल्ड या प्रकल्पा दि.२७/०२/२०२३ रोजी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज सादर करून माहिती मागितली होती.

**अपिल दाखल करण्याची कारणे**:-

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता मागितलेली माहिती न देता अर्धवट माहिती दिशाभूल करण्याचे प्रयत्न करणे व जाणुनबुजून माहिती लपविली असल्याने अपिलार्थी अर्जदार दि.०९/०५/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचेकडे प्रथम अपिल द केले.

**सुनावणीचा तपशिल**:-

अपिलार्थी उपस्थित असून जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान वि हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:-

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता मागितलेली माहिती न देता अर्धवट माहिती दिशाभूल करण्याचे प्रयत्न केला असून जाणुनबुजून माहिती लपविली असल्याने अपिल केले आहे.